# चपलांच्या खोटांची झीज थांबवायचीय ना ?

'अरे, आपल्या सुमेच्या लग्नासाठी तिच्या मामाने ठिकठिकाणी पत्रिका दाखवून अगदी चपल्या झिजवल्या.' अशी किंवा तत्सम चप्पल झिजवल्याची वाक्ये आपल्यापैकी बऱ्याच जणांनी ऐकली असतील. अहो, नुसतीच ऐकली कशाला, पैजेवर सांगतो, की तुम्ही तसा खेटे मारण्याचा अनुभवही घेतला असणार.

पण कालपरत्वे जमाना बदलत गेला आणि संदर्भातून सांगितलेली, सुचवलेली लग्नपध्दती मागे पडत चालली. नाही म्हणायला ठिकठिकाणी वधूवर सूचक मंडळे होती पण त्यात नाव नोंदवलेल्या मुलंमुली म्हणजे मतदानाचे कार्ड भरल्यासारखे आपले नाव नोंदवणार आणि चुकूनमाकून एखादया मुलाने आपल्या सुमेला पहायची तयारी दर्शवली तर तोपर्यंत सुमेचे लग्न होऊन ती झालेली असते दोन मुलांची आई !!

याच वधूवर सूचक मंडळांचे फायदे तोटे, गुणदोष लक्षात घेऊन आपल्या इथल्या फिलाडेल्फियाच्या मंदार व गौतमी जोगळेकर यांनी सुरू केलयं 'मधुमिलन'.

कोकणातल्या रत्नागिरीजवळील साखरप्याच्या जोगळेकर कुटुंबातला मंदार तर चिपळूणच्या फडके कुटुंबातली गौतमी. वास्तविक पहाता या बुद्धिजीवी जोडप्याला ८ – ५ नोकरी करून अमेरिकेत आरामात जीवन जगता आलं असतं. पण आपण या समाजाचे सदैव काहीतरी देणं लागतो, या उदात्त भावनेतून या जोडप्याचे काहीतरी वेगळं समाजपयोगी माध्यम शोधत रहायचे प्रयत्न असतात.  मग ते साखरप्याच्या मुलांना शिक्षणासाठी सहाय्य असो, नित्यनियमाने घरी चालणारा दत्तजयंतीचा उत्सव असो किंवा अमेरिकेत सत्यनारायणाची मराठी अर्थासकट समजावून सांगण्याची पूजा असो.

BMM  च्या मैत्र या अधिवेशनाने MadhuMilan.com या वेब साईटची किंवा जोगळेकरांच्या या नव्या सामाजिक कार्याची सुरुवात झाली. रात्रंदिवस जीवापाड मेहनत करुन गायत्री व स्वरुप या दोन मुलांसोबत त्यांनी मधुमिलन हे आपले तिसरे बाळही वाढवले.

इतर संस्थांपेक्षा  मधुमिलनचा साचा बराच वेगळा आहे. जगभरातल्या विविध वधुवर सूचक मंडळांना एकत्र आणून त्यांना इंटरनेटच्या द्वारे एक फोरम उपलब्ध करुन देणे हा त्यांचा मुख्य हेतू. म्हणूनच की काय, जगातल्या विविध शहरात मधुमिलनची centers आहेत.  ही centers म्हणजे तुमच्या आमच्या सारख्याच व्यक्ति ज्या मधुमिलनच्या ध्येयाकडे एक सामाजिक बांधिलकी व या कार्यासाठी त्यांचे योगदान याच उद्‌देशाने बघतात. लग्न जुळवण्याच्या या सर्व प्रक्रियेमध्ये वधुवराच्या कुटुंबियांचा online सहभाग हे मधुमिलनचे एक खास वैशिष्ठ्य.

जास्त कशाला लिहू? तुम्हीच http://www.MadhuMilan.com ही वेबसाईट पहा आणि या सर्व features ची स्वतःच खात्री करुन घ्या.

तर, असे हे मधुमिलन. दोन जीवांना एकत्र आणणाऱ्या या मंदार व गौतमी जोगळेकरांच्या उपक्रमाला याहून दुसरे समर्पक गोड नाव कुठले बरे असेल?

आशिष चौघुले
E-Mail : achaughule@comcast.net
(302) 235-7295